## प्रकरण दुसरे

### रविकिरण मंडळातील कवी आणि यशवंतांचे रविकिरण मंडळातील स्थान

रविकिरणमंडळाचा उदय होण्यापूर्वीची व रविकिरण मंडळ स्थापनेनंतरची पार्श्वभूमी आपण गेल्या प्रकरणात पाहिली. त्यामुळे याप्रकरणात त्याचा ऊहापोह करण्याची आवश्यकता नाही. कवींची मंडळे स्थापन करण्याचा रविकिरण मंडळाचा उपक्रम हा नविन नव्हता. त्यांच्या कितीतरी आधी गोविंदाग्रजांनी 'तुतारी' मंडळाची स्थापना केली होती. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अशी कवी मंडळे होती. पण या सर्व मंडळात रविकिरण मंडळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. लोकांना आपल्या कवितेचे वेड लावले. या रविकिरण मंडळाच्या जन्माची हकिकत थोडीशी अशी. -

**शारदामंदिर ते रविकिरणमंडळ -**

१९२० च्या ऑक्टोंबर महिन्यात पुणे येथे 'श्री महाराष्ट्र शारदा मंदिर' या वाङमयीन मंडळाची स्थापना झाली. १९२१ च्या जूनमध्ये या मंडळाचे प्रत्यक्ष कार्य सुरु झाले. या मंडळात अनंत तनय, अज्ञातवासी, गिरीश, प्रा.श्रीकृष्ण निलकंठ चाफेकर, अरविंद शिंदे, शामराव काळे अशी मोजकीच मंडळी होती. त्यामंडळाचे कार्य मराठी काव्याची आवड समाजात उत्पन्न होईल असे प्रयत्न करने, कवी लेखक आणि वाङमयाची आवड असणारे वाङमयभक्त यांचा परिचय करविणे व सलोखा वाढविणे, महाराष्ट्रातील कविंच्या कविता, चरित्रविषयक माहिती यांचा संग्रह करणे, नामवंत कवींची सरस काव्ये प्रकाशित करणे, कवी संमेलन भरविणे, काव्य गायनाचे कार्यक्रम करणे, महाराष्ट्र साहित्य संमेलन भरविणे, चर्चात्मक कार्यक्रम करणे, या प्रकारचे बहुविध कार्यक्रम आखले जात.(१)

''शारदा मंदिरा''चे अध्यक्ष कवी आनंत तनय उर्फ द.अ. आपटे हे होते व उपाध्यक्ष श्री. नि. चाफेकर हे होते. दोघेही सनातनी वृत्तीचे असल्याने कार्यक्रम जुन्या पद्धतीने होत असत. अनंत तनय लिहीत असलेल्या 'शारदा' मासिकातील कवीतांची परिक्षणे जुनी व बोचक असत. 'श्री महाराष्ट्र शारदा मंदीरा'चे कार्यक्रम जुन्याचे वळण घेत असत. जुनी वृत्ते, जुने आशय, जुन्या कल्पना, जुन्या पध्दती यांचाच विशेष पुरस्कार होत असे. श्री महाराष्ट्र शारदा मंदिराच्या कार्यक्रमांना माधवराव भिडे, ना.म. भिडे, दिवाकर, य.दि. पेंढारकर, श्रीधर बाळकृष्ण रानडे, दत्तात्रय लक्ष्मण गोखले, गजानन त्र्यंबक माडखोलकर, सौ. मनोरमा रानडे, माधवराव पटवर्धन वगैरे जुने नवे साहित्यिकही उपस्थित रहात असत. एकदा 'श्री महाराष्ट्र शारदा मंदिरा'च्या कार्यक्रमात माधवराव पटवर्धनांनी आपल्या कविता व गज्जला मोकळेपणाने वाचून दाखविल्या. त्या श्री. बा. रानडे, सौ. मनोरमा रानडे, द.ल. गोखले, दिवाकर, यशवंत, गिरीश, ग.त्र्यं. मालखोडकर यांना फार आवडल्या पण इतरांना त्या आवडल्या नाहीत. मंदिराच्या जुन्या धोरणामुळे नवमतवादी कवी, लेखकांची कुचंबना होऊ लागली. म्हणून श्री. बा. रानडे यांच्या सल्ल्यानुसार त्यामंडळीनी 'श्री महाराष्ट्र शारदा मंदिरा'चे काम व्यवस्थित चालू ठेवून दर रविवारी दुपारी ३ वाजता कोणाच्यातरी घरी जमून चर्चा करावी असे ठरले. व काही समानशिल कविंना स्वतत्रं कवीमंडळ स्थापन करण्याची स्फूर्ती झाली.(२) ''संडे टि क्लब'' असं नाव त्यांनी सुरुवातीला धारण

केलं. पुढे, 'डे' चा लोप होऊन ''सन टि क्लब'' असं नाव रुढ झालं. पण पुढे - सूर्यांच्या किरणांच पृथक्करण केलं म्हणजे सात रंग उमटतात, एकूण सभासद सात (मनोरमाबाई वगळता) म्हणून रविकिरण मंडळ हे नाव धारण केलं.(३)

या मंडळाचे सभासद :

१) श्री. बा. रानडे.

२) सौ. मनोरमाबाई रानडे.

३) गिरीश.

४) माधव जूलियन.

५) यशवंत.

६) ग.त्र्यं. मालखोडकर.

७) द.ल. गोखले.

८) दिवाकर.

या सभासदांमध्ये कवी गिरीश व श्री. बा. रानडे हे प्रथम दोघेच विवाहीत होते. त्यामुळे रविवारच्या बैठका व चहापानाचा कार्यक्रम हा गिरीशांच्या पुण्यातील शनवारपेठेतील घरात किंवा श्री. बा. रानडे यांच्या घरी होत असे. 'मंडळात हे कवी आपल्या कविता वाचून दाखवित असत. त्यावर चर्चा होई गुणदोष दाखविले जात. पूर्वसूरींचे हे वाचा, ते वाचा, अशा शिफारसी होत. त्याप्रमाणे वाचण्याचा सदस्य प्रयत्न करीत. (४) तसेच या बैठकीमध्ये पुरोगामी विचारांची बीजे रूजवली जात असत. सुनीत भावगीत, नाट्यगीत गज्जल यांच्या तंत्रावर, तसेच कथा, कादंबरी, नाटक, निबंध व टीका यावरील विचारविनिमय होत असे. छंद:शास्त्र, भाषाशुध्दी व इतर वाड्:मयावर चर्चा केली जात असे साहित्याच्या अंगोपांगाचा विचार साप्ताहिक बैठकीत होत असे. काव्यगायन हे बैठकीचे फार मोठे आकर्षण होते. रविकिरण मंडळाचा सभासदवर्ग एकध्येयी होता. रसिक होता पुरोगामी व सौंदर्यजीवी जीवनाची व साहत्याची ओढ आणारा होता. त्यामुळे नवीन लेखन, नवीन कवी, नवीन विचार, प्रगतीपर धोरण येऊ लागले. यातील काही सदस्य पदवीधर होते. तर काही नव्हते पण हा वाद कधीच निर्माण झाला नाही.

## साहित्यनिर्मीती

**१) किरण :** हे रविकिरण मंडळाचं पहिलं पुस्तक सप्टेंबर १९२३ मध्ये निघालं. त्यात सर्वांच्या कविता आणि दिवाकरांच्या दोन नाट्य आल्या 'बाळकृष्ण अनंत भिडे या त्या काळातल्या पहिल्या पठडीतल्या टिकाकारांनी 'विविध ज्ञानविस्तारा'तून कडक टिका केली ''ही मंडळी पेशवाईतला रावबाजीचा काळ पुन: गाजविणार असं शेलापोगोटे दिले.' (५) त्यावरून या पुस्तकातील

काव्यविषयांची कल्पना येईल. ''किरण'' वर टिका झाली तेव्हा टिकेला उत्तर देऊ नये असं ठरलं पण रविकिरण मंडळाचा काव्यविषयक दृष्टीकोण कसा आहे हे कळावं म्हणून.

२) **काव्यविचार** - हा काव्यविषयक लेखसंग्रह मंडळातर्फे प्रसिध्द केला त्यात

| | | |
|---|---|---|
| १) माडखोलकर | : | १. केशवसुत आणि २. शाहिरी कविता. |
| २) श्री. बा. रानडे | : | सुनित. |
| ३) गिरीश | : | नाट्यगीत |
| ४) माधवराव | : | वृत्तविचार. |
| ५) यशवंत | : | गोविंदाग्रज. |
| ६) द.ल. गोखले | : | भावगीत. |

असे लेख होते. सदस्यांच्या काव्यविषयक भूमिका यात स्पष्ट केली होती. १९२५ च्या सुमारास मंडळाचा (३) **'उषा'** हा संग्रह प्रसिध्द झाला. त्यानंतर वि.द.घाटे यांचे मंडळात आगमन झाले. या सर्वांचा मिळून (४) **'शलाका'** हा संग्रह निघाला. (५) **'प्रभा'** हे वर्गणीतलं शेवटचं पुस्तक. पुढे प्रत्येकाची निर्मीती वाढत गेल्यामुळं वर्गणीची कल्पना बारगळली मग प्रत्येकाने आपापल्या खर्चानं पण मंडळाच्या नावावर स्वतंत्रपणे पुस्तक प्रसिध्द करणं सुरू केलं.

**काव्यगायन**

रविकिरण मंडळाने काव्यगायनाचा प्रकार लोकप्रिय केला आणि कविता घरोघर पोहोचविली. या कवींच्या आधी आनंदराव टेकाडे सभासंमेलनातून आपल्या कविता म्हणत असत ते राष्ट्रकवी म्हणून ओळखले जात. कवी सुमंत हेही छोट्या बैठकांतून काव्यगायन करीत. टेकाडे हे टिळकपंथीय होते आणि प्रामुख्यानं राजकीय सभांतच त्यांचं काव्यगायन अधिक होई. शिवाय बा. गो. मायदेवही काव्यगायन करीत पण काव्याची अभिरूची वाढावी म्हणून महाराष्ट्रभर यशवंत, गिरीश आणिी माधवराव यांनी काव्यगायन केलं आणि कावयगायनाची प्रथा लोकप्रिय केली. ऐतिहासिक काळात होताजी प्रभाकरादि शाहिरांच्या लावण्यापोवड्यांना हजारो श्रोत्यांचे कडे जसे पडे तसेच यशवंत - गिरीशांचे काव्य-गायन म्हटले की तेथे आबालवृध्द रसिकांची गर्दी उडे. (६) काव्यगायनाअभावी त्यांची कविता सर्वसामान्य रसिकापर्यंत पोहोचू शकली असती की नाही कोण जाणे. काव्यगायनानेच त्यांची कविता अधकि लोकप्रिय झाली. काव्यगायनामागील उद्देशच कविता लोकप्रिय करण्याचा, कविता जनमानसात रूजविण्याचा होता. ''त्यावेळी आधुनिक कवितेबद्दल असा आक्षेप होता की या चालीवरच नवीन कविता म्हणता येत नाही. त्यामुळं मासिकांची पानं कविता दिसताच उलटली जात तेव्हा आपली कविता लोकांच्या कानी जायला पाहिजे असं वाटू लागलं. म्हणून आम्ही काव्यगायनाचे कार्यक्रम सुरू केले.'' (७) असं यशवंत सांगतात. पण हे काव्यगायन भावगीत गायकासारखं नव्हतं, त्यांनी शब्दाच्या

ध्वनीवर भर दिला. या काव्यगायनामुळे लोकांची वृत्ती काव्याभिमुख झाली, पुर्वी अगदी मोजके लोकच कविता वाचत पण या कविंच्या जाहीर कार्यक्रमामुळं अधिकाधिक लोक त्यांच्या गेय चालीवर कविता वाचू लागले.

या काव्यगायनामुळं या कवींना अफाट लोकप्रियता मिळाली. कविता हा खरंतर जनसामान्य रसिकांच्या नावडीचा विषय पण लोकांना या काव्यगायनामुळं कवितेत गोडी वाटू लागली. पण आशयाच्या बाबतीत ती कविता थिटी ठरली. 'तो काळच असा होता की रविकिरण मंडळाने कविता लोकप्रिय केली होती ती गाऊन दाखवून आणि मग कविता गायची म्हटलं की ज्या तडजोडी येतात त्या सर्व तडजोडी रविकिरण मंडळाने पत्करल्या. मग त्यासाठी जनसामान्यांच्या पातळीवर उतरून कौटुंबिक सुखदुःखाचे आणि ठराविक प्रेमकल्पनांचे चित्रण ही कविता करते. ती 'गाण्या'साठी लिहीली जात असल्यामुळे तिने जीवनाचा कधी सखोल असा वेध घेतला नाही. ''गाणे '' प्रथम ठरले आणि कविता - काव्य दुय्यम बाब ठरली.' (८) आणि म्हणूनच मराठी विडंबन कवितांचे आचार्य प्र.के. अत्रे यांनी त्या काव्यगायनप्रणालीची श्रध्दा करण्याच्या लहरीत असे लिहीले.

''दावू गाऊन आमच्याच कविता
आम्हीच रस्त्यामध्ये ''

त्याला उत्तर म्हणून माधव जूलियनांनी पुढील ओळी लिहील्या _

''काव्ये गाऊन घेतल्याविण
महाराष्ट्रास त्यांची चवी
येई पारखता न
तोवर असे होवोत गाते कवी. ''

मानधनाच्या अपेक्षेशिवाय स्वखर्चाने काव्यगायनाचे कार्यक्रम केले.

## रविकिरण मंडळाच्या कवितेचे स्वरुप

रविकिरण मंडळाच्या सदस्यांनी नवीन प्रकारची आत्मनिष्ठ प्रेमगीते लिहीली आणि काव्यरचनेच्या बाबतीत अनेक प्रयोगकरुन पाहिले. त्यांनी काव्याचे बहिरंग बदलण्यासाठी जे प्रयत्न केले त्यापैकी सुनीत, गझल, रुबाया इत्यादि नवीन काव्यप्रकारांनी आधुनिक कवितेला नाविन्य प्राप्त करुन दिले तसेच निरनिराळ्या जातींचा विपुल उपयोग करुन कवितेत गेयताही भरपूर आणली. रचनेच्या बाबतीत जसे नाविन्य आणले तसे आणि तितकेच नवीन अनुभूती आणि नवीन आशय कवितेत आणले. केशवसुतांनी रुढीग्रस्त समाजविरुध्द लढाई पुकारली. विविध अन्यायामुळे समाजाचा ऱ्हास होत असल्यामुळेच सर्वच समाजाची अंतर्बाह्य नीवन रचना करावयास पाहिजे हा एका व्यक्तीच्या खाजगी दु:खाचा प्रश्न नसून साऱ्या समाजाचाच प्रश्न आहे असा केशवसुतांचा आरोप आहे तर व्यक्तीच्या अनिर्बंध स्वैर जीवनाचा आड समाज येतो म्हणून त्याची पर्वा करण्याचे कारण नाही असे या कविंचे म्हणणे आहे. हा आरोप काहीसा अतिरेकी वाटतो. उलट केशवसुती परंपरेचाच विकास या कविंनी केला मात्र विस्तारामुळे पहिली सखोलता व उत्कटता राहिली नाही. (९) लोकांच्या रोजच्या साध्या जीवनातल्या अनुभवांना त्यांनी वाचा दिली. त्यांच्या कवितातील भावना अगदी साध्या माणसाच्या अनुभवाच्या कक्षेत येऊ शकते. अशा कवितेतील प्रतिमासृष्टीही फारशी तरल नसते. ती बहुतांशी दृश्य असते व म्हणून तिचे सहजच आकलन होते. या दृष्टीने महाराष्ट्रीय जीवनातील या कालखंडाला 'साधारणाचे युग' म्हणायला हरकत नाही. (१०) मात्र रविकिरण मंडळातल्या कवींनी काव्याच्या प्रांतात वावरुनही साधारण जीवनाचे वास्तवशून्य वर्णन केले नाही. साधारणांच्या भावना व आकांक्षा त्यांनी साधारणांच्या भूमिकेवरुनच व्यक्त केल्या. एकट्या रविकिरण मंडळाचा हा दोष नव्हता. 'रविकिरण मंडळाच्या वैभवाच्या दिवसांतील एकंदर वृत्ती अशीच होती. समोर दिसेल त्यात मन रमविण्यात सहजप्राय दिसेल त्यात जीव गुंतविण्यात एकंदर सर्वच कलावंत समाधान मानीत होते.' (११)

रविकिरण मंडळाच्या कार्याचे निरीक्षण करताना असेच जाणवते की, कविता जनसामान्यांपर्यंत ~~कविता~~ पोहोचविण्याचे कार्य या मंडळाने केले. १९२० मध्ये गोविंदाग्रज, बालकवी आदी कवी श्रेष्टींच्या निधनाने काव्यप्रांतात जी एक पोकळी निर्माण झाली होती ती भरुन काढण्याचे आणि काव्याचा प्रवाह पुढे नेण्याचे कार्य केले. अवीचीन मराठी कविता याआधी कविजनांतच वाचली जात होती. रविकिरण मंडळाने शिक्षित वर्गातच का होईना पण कविमंडळा बाहेरच्या लोकांनाही ती परिचित करुन दिली. श्रोत्यांची जाणीव नेहमी ठेवली त्यांची मने रिझविणे त्यांना आराम देणे ही त्यांनी आपली कर्तव्ये समजली. रविकिरण मंडळाच्या काव्यकर्तृत्वाची यादी निशिकांत ठकार यांनी आपल्या 'मराठी कविता : स्वरुप आणि विवेचन' या पुस्तकात दिली आहे. ती काहीशी पुढीलप्रमाणे -

१) मराठी काव्याचा विस्तार व व्यवस्थापन करणे.

२) सामाजिक खंडकाव्यांची रचना करणे व बिंदुस्रावी आक्षेपाचे खंडन करणे.

३) प्रेमकाव्यप्रकार समृध्द करणे हे काव्याचे प्रेमयुग होते, असेही म्हटले गेले आहे.

४) व्यक्तीवादी - आत्मकेंद्रित भूमिकेला प्राधान्य देऊन व्यक्ती स्वातंत्र्याचा घोष करणे.

५) कला - कारागिरीसंबंधीचा चोखंदळपणा.

६) जानपदगीतांची रचना.

७) गझल व रुबाईचा पुरस्कार व प्रसार.

८) अनेक प्रकारच्या जातिरचनांचा पुरस्कार करुन रचना विषयक नवे प्रयोग करणे.

९) काव्यात वास्तवता आणि सहेतुकता आणणे.

हे काव्यकर्तृत्व गुण आणि दोष दोन्हींनी व्यापलेले आहे. त्यांचे हे कर्तृत्व काव्यदृष्ट्या उपयुक्त असूनही काव्यात मात्र केवळ टूम बनून राहहिले व पुढे हास्यास्पद झाले. (१२) इतके की विडंबनकार अत्र्यांच्या झेंडूच्या फुलांच्या प्रस्तावनेत स.ग. मालशे उपहासाने लिहीतात..... मग काव्यक्षेत्रात सामुदायिक शेतीसारखा प्रयोग सुरु झाला. मराठीत खंडकाव्ये नाहीत ? लिहा खंडकाव्ये. गझला नाहीत ? लिहा गझला. सुनीते नाहीत ? खरडा सुनीते. विलापिका नाहीत ? काढा गळे. पुन्हा यांच्यातलेच टिकाकार या प्रयोगाची प्रशंसा करुन पत पुरवठा करीत होते. असा मोठा विचित्र फड सजला. (१३) गुणांकडे दुर्लक्ष करुन दोषावरच बोट ठेवले गेल्याने रविकिरणमंडळाकडे बघण्याचा दृष्टीकोन दूषित झाला. टिकाकारांनीही असाच दोष दिग्दर्शनपर सूर पकडलेला दिसतो. पण अमाप लोकप्रियतेची पावती रविकिरणमंडळाला मिळाली होती ती त्यांच्यात काही गुण होते म्हणूनच.

**रविकिरणमंडळातील कवी -**

रविकिरणमंडळाची सभासदसंख्या सात असली तरी गिरीश, यशवंत आणि माधव जूलियन हे तिघेजण या मंडळातील प्रमुख कवी. तरीही इतर कवींची काव्यसेवाही विचारात घेणे उपयुक्त ठरेल.

**श्री मनोरमा -**

श्री.बा.रानडे आणि सौ. मनोरमाबाई रानडे ही पति-पत्नि म्हणजे रविकिरणमंडळाच्या काव्याला जीवनाचे आधिष्ठानभूत असे दंपत्य होते. रविकिरणमंडळाच्या सुरुवातीच्या बैठका त्यांच्याच घरात होत असत. रविकिरणमंडळाच्या एकात्मतेला आणि विकासाला या दंपत्याने फार मोठा हातभार लावला. ते दोघे स्वत: कविता लिहीत. श्री.बा. रानडे यांनी 'काळाच्या दाढेतून' हे खंडकाव्य लिहीले. 'श्री. मनोरमा' या स्फुट कवितांच्या संग्रहात दोघांच्या कविता प्रसिध्द झाल्या. मनोरमाबाईच्या ९२ कविता आहेत. आधुनिक मराठी काव्याच्या इतिहासात काव्यप्रीतीमुळे प्रेम जमून विवाहित झाल्याचे पहिले उदाहरण म्हणजे हे दोघे होत. रानडे यांची स्फुट कविता पाऊणशेपेक्षा कमीच आहे. मनोरमाबाईंनी स्त्री असूनही स्त्रीगीने न लिहीला पुरुषांप्रमाणे भावगीत स्वरुप आत्मलेखन केले आहे. हा त्यांचा लक्षणीय विशेष होय. रविकिरणमंडळ स्थापन झाल्यावर लवकरच त्यांचे निधन झाले. श्री.बा. रानडे यांचाही काव्यलेखनांचा ओघ नंतर थांबला.

वि.द. घाटे -

ग. त्र्यं. माडखोलकर -

द.ल. गोखले -

तिघांचा सामग्राने उल्लेख करण्याचे कारण यांची काव्यनिर्मिती खूपच कमी आहे. रविकिरण मंडळातील एक सदस्य नाट्यछटाकार दिवाकर हे मंडळातून निघून गेल्यावर मंडळात वि.द. घाटे यांचा समावेश झाला. मंडळाने समूहिकरित्या काढलेल्या पुस्ताकांत त्यांच्या कविता समाविष्ट आहेत. नंतर पाटवर्धनांच्या सहकार्याने 'मधु-माधव' हा काव्यसंग्रह प्रसिध्द केला (१९२४) नंतर त्यांचे कवितालेखन जवळजवळ थांबल्यासारखेच झाले. माडखोलकर आणि गोखले या दोघांचाही स्वतंत्र किंवा सहकार्यानेही प्रकाशित झालेला संग्रह नाही. माडखोलकरांनी गद्याचे माध्यम स्वीकारले. गोखल्यांनी संस्मरणीय अशी काहीच साहित्यसेवा केल्याचे दिसत नाही. काव्याच्या दृष्टीने हे तिघेही सभासद मंडळाचे कार्यकारी सभासद ठरले नाहीत. त्यामुळे माधव जुलियन, यशवंत आणि गिरीश हेच मंडळाचे खरे अध्वर्यू ठरतात.

माधव जूलियन -

माधवराव पटवर्धनांचा जन्म बडोदे येथे ११ जानेवारी १८९४ रोजी झाला. इंग्रजी शिकत असताना ऐच्छीक भाषा म्हणून फार्शीचा अभ्यास केला १९१६ साली ते फार्शी व इंग्रजी हे विषय घेऊन बी.ए. झाले. १९१८ साली ते एम.ए.ची परीक्षा दुसऱ्या वर्गात उतरले त्यावेळीही त्यांचे विषय फार्शी व इंग्रजी हेच होते. त्यांचा या फार्शीच्या व्यासंगाचे फल म्हणजे त्यांनी प्रसिध्द केलेला फार्शी मराठी कोश. त्यासाठी सतत पाच वर्षे ते परिश्रम करीत होते. मराठीत हा कोश अजूनही अद्वीतीयच आहे. एम.ए. झाल्याबरोबर त्यांना पुणे येथील फर्गुसन कॉलेजात फार्शीच्या प्राध्यापकाचे काम मिळाले ते त्यांनी १९२४ सालापर्यंत केले नंतर राजीनामा देऊन त्यांनी चार वर्षे हायस्कूलच्या शिक्षकीत घालविली. १९२८ साली कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजात फार्शीचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली तेथे ते अकरा वर्षे होते. १९३३ साली नाशिक येथे कविसंमेलन भरले त्याचे अध्यक्षस्थान माधवरावांना देण्यात आले तसेच १९३६ साली जळगांव येथे महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले त्याच्या अध्यक्षस्थानी माधवरावांची नेमणूक झाली. 'छन्देरचना' ह्या त्यांच्या परिपूर्ण प्रबंधामुळे मुंबई विद्यापिठाने माधवरावांना १९३९ साली डॉक्टर (डी.लिट्) ही पदवी अर्पण केली. मराठी विषयात ही पदवी मिळविणारे माधवराव पहिले.

वाङ्मयनिर्मिती -

सुमारे वीस वर्षे माधवरावांनी गद्य-पद्यलेखन केले. १९२६ साली त्यांचा 'विरह-तरंग' काव्यसंग्रह बाहेर पडला.

२) सुधारक - सामाजिक उपहासपर खंडकाव्य - १९२८

३) उमर खय्यमच्या रुबाया - भाषांतर - १९२९

४) द्राक्षकन्या - फिट्झजेरल्ड उमर खय्यामच्या रुबायांचे भाषांतर - १९३१

५) गज्जलांजली - गज्जलांचा संग्रह - १९३३

६) स्पप्नरंजन - स्फुट कवितांचा संग्रह - १९३४

७) तुटलेले दुवे - सुनीतांचा संग्रह करुन सांगितलेली कथा - १९३८

८) नकुलालंकार - वाङ्मयीन झब्बूशाहीवरील उपहासपर काव्य - १९३९

९) मधुलहरी - स्फुट कवितांचा संग्रह व भाषांतरीत रुबाया

१०) छंदोरचना - नवीन छंदोविचार - १९३७

त्यांनी नुसती कवितेचीच निर्मिती केली नाही तर काव्या बरोबरच पंडित्यपूर्ण गद्यलेखनही विपुल केले. भाषाशुध्दी विवेक, पार्शी मराठी कोश, छन्दोरचना, काव्यचिकित्सा इत्यादी ग्रंथ त्यांच्या पंडित्यपणाची साक्ष देतात. साधारणपणे कविजनांस न लाभणारी बुध्दीची तीव्रता पटवर्धनांस जशी लाभली होती. तशीच साधारणपणे पंडितांस न लाभणारी भावनाशीलनाही त्यांना मिळाली होती. यामुळे त्यांच्या काव्यांत दोनहि गोष्टींचे - पंडित्याचे आणि भावनेचे - अपूर्व आणि काही वेळा मनोहर तर कांही वेळा चमत्कारिक असे मिश्रण झालेले आढळते.

**कवितेचे विशेष -**

माधवरावांनी आपल्या कवितेतून प्रणयविषयक नवीन अनुभूती आणली. माधवरावांनी कविता प्रामुख्याने प्रेमाचे स्वर आळवणारी आहे म्हणून काहींनी त्यांस 'प्रणयपंढरीचे वारकरी' असे म्हटले आहे. असे असले तरी त्यांच्या कवितांतून सर्वस्पर्शी कल्पकता दिसून येते. त्यांनी अभंगाची रचना केली आहे. ते वारकरी असले तरी प्रणयपंढरीचे आहेत. अभंग हा काव्य प्रकार म्हणून हाताळला आहे भक्तीगीत म्हणून नाही. काही कवितातून राष्ट्रयत्वाची भावना प्रगट झालेली दिसून येते. गज्जल सारखा प्रकार त्यांनी मराठीत आणला आणि रुढ केला. चरणाच्या शेवटचा वर्ण स्वरान्त न ठेवता व्यंजनांत ठेवण्याचाही त्यांनी उपक्रम केला. फारसी शब्दांच्या मराठी काव्यात बराच उपयोग केला. त्यावेळी पटवर्धनांनी आपल्या कवितांत त्यांची रेलचेल उडवून दिली होती. पण त्यामुळे त्यांचे काव्य हास्यास्पद ठरु लागले. माधव ज्यूलियन यांच्या काव्यात हास्यास्पदेचा अंश बराच होता नाविन्याच्या नावाखाली त्यात फारशी उर्दू आणि गावठी मराठी शब्दांची बेंगरुळ भेसळ केलेली असते. सुनीत हा काव्यप्रकार मराठीत रुढ होण्यास त्यांचा फार मोठा हातभार होता.

'व्यक्तीच्या अनिर्बंध स्वैर जीवनाच्या आड समाज येतो आपलया वैयक्तिक इच्छांचा व आकांक्षांचा समाजामुळे चुराडा होतो म्हणून व्यक्ती विरुध्द समाज हा झगडा त्यांच्या कवितेत दिसून येतो. व्यक्तीच्या महत्वाचा पुरस्कार त्यांनी केला. सामाजिक हितहितांच्या कक्षेबाहेरही व्यक्तीच्या काही अनिर्वचत्रीय भावना असू शकतात हे नि:संकोचपणे सांगितले.' (१४)

प्रेमाला सारसर्वस्व मानणे प्रेयसीला सर्वस्व अर्पण करण्याची तयारी दाखविणे, प्रेयसीच्या प्रेमाची प्राप्ती झाली नाही तरी

तिजविषयांची आपुलकीची भावना कायम ठेवून तिच्या सुखद स्मृतीत तल्लीन होऊन राहणे, प्रेयसीचे प्रेम लाभावे यासाठी काही वेळा अगदी दिनवाणी लाचारी पत्करणे इत्यादी गोष्टी गडकऱ्यांप्रमाणे माधवरावांच्या कवितेत दिसून येतात. माधवरावांच्या कल्पनाशक्तीने स्त्रियांचे सर्व सौंदर्य एकवटून शब्दात पकडण्याचा प्रयत्न केला यातच त्यांची कला सामावली आहे. .

प्रणयनिराशेच्या पोटी उत्पन्न झालेली विषण्णता गोड हुरहुर, स्वप्नाळू वृत्ती, पूर्वस्मृतीत रममाण होण्याची लालसा, निष्काम प्रेमाची आसक्ती, समाजाविरुध्द बंडखोरी ही माधवरावांच्या स्फुट कवितांची महत्वाची वैशिष्ट्ये होत. (१५)

**गिरीश –**

गिरीशांचा जन्म सातारा जिल्ह्यातील फत्यापूर या गावी २८ आक्टोबर १८९३ रोजी झाला. गिरीशांचे बालपण एकत्र कुटुंबात गेले. त्यामुळे कुटुंबाविषयी कमालीची आत्मियता, प्रेम, जिव्हाळा त्यांच्याजवळ होता. गिरीशांचे मराठी शिक्षण इ.स.१८९९ पासून रहिमतपूरच्या शाळेत झाले. इंग्रजी शिक्षण साताऱ्यास झाले तिथेच त्यांच्यात मराठी कवितेची आवड निर्माण झाली व शास्त्रीय संगीताचे ज्ञानही तिथेच घेतले. १९३० साली ते एम.ए. झाले. शिक्षण क्षेत्रात प्रवेश केला १९३० ते ३४ पर्यंत फलटणच्या मुधोजी हायस्कूलमध्ये नोकरी केली. १९३५ ते ३७ अखेर गिरीशांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. १९४० ते १९५४ पर्यंत सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये काम केले. १९५५ पासून गिरीश परत मुधोजी हायस्कूल फलटण येथे गेले. १९५९ साली आदर्श शिक्षक म्हणून सरकारने राष्ट्रपती पारितोषिक दिले राष्ट्रपती पारितोषिक दिलेले पहिले महाराष्ट्रय कवी गिरीशच होत.

गिरीश जात्याच उत्तम शिक्षक होते शिकविण्यात त्यांना अपूर्व गोडी वाटत होती. त्यांच्या सामाजिक विषयावरील खंडकाव्यांनी आणि स्फूट कवितेने समाजाला शिक्षण देण्याचेही उत्तम प्रकारे कार्य केले आहे. (१६) कवितेमागची प्रेरणा शिक्षकाची आहे हे यातून जाणवते.

१९२१ च्या सुमारास त्यांनी 'अभागी कमल' व त्यानंतर 'आंबराई', 'कला' ही खंडकाव्ये लिहीली. कांचनगंगा, फलभार, मानसमेघ, इत्यादी काव्यसंग्रही प्रसिध्द झाले.

गिरीशांच्या वाङ्मयात अश्लिलता, स्वैरविलास, शृंगारिक उत्कटंता, भडकपणा यांचा लेशही आपणास आढळला नाही. सात्विक आणि संपत भावना रेखीव रचना आणि कातीव कल्पना यांच्यातच त्यांच्या वाङ्मयीन मूर्तीचा वापर अधिक असतो.(१७)

गिरीशांनी शास्त्रीय संगीताचे ज्ञान घेतले होते त्यात त्यांना त्यांच्या गोड गळ्याची साथ मिळाली व रविकिरणमंडळाच्या प्रथेनुसार काव्यगायनाची जोड मिळाली. व त्यांनाही काव्य गायनामुळे महाराष्ट्रात प्रसिध्दी मिळाली. गिरीशांची कविता रविकिरणमंडळाच्या आश्रयाने आधाराने फोफावली. रविकिरण मंडळाची घटना त्यांच्या वाङ्मयीन जीवनाला अतिशय उपकारक ठरली. खंडकाव्य हा काव्यप्रकार मराठीत रुढ व लोकप्रिय होण्यास गिरीशांच्या खंडकाव्यानी फार मोठी कामगिरी केली.

गिरीशांच्या प्रत्येक कवितेच्या मागे काही घटना प्रसंग अनुभव असलल्याचे त्यांच्या कवितेतून जाणवते. अशा प्रकारच्या कवितांचा रसस्वाद घेताना त्यापाठीमागिल प्रसंग, घटना समजून घ्याव्या लागतात.

गिरीशांच्या काव्यात पटवर्धनांची भावनेची उत्तानता किंवा यशवंतांची उत्कटता नाही. संयम हा त्यांच्या लेखनाचा गुण आहे. त्यांचे लेखन उत्कट तळमळीतून निर्माण होणाऱ्यापेक्षा खोल सहानुभुतीतून निर्माण झाले आहे. त्याच्या पाठीमागे भूतदयावाद आहे समतेकरीता हिरीरीचे भांडण नाही. (१८)

१९६८-६९ नंतर गिरीशांचे लेखन थांबले आणि ४ डिसेंबर १९७४ रोजी त्यांचे निधनही झाले.

**यशवंतांचे रविकिरण मंडळातील स्थान –**

रविकिरण मंडळातील इतर कवीपेक्षा यशवंतांनी दिर्घकाळ काव्यरचना केली. आणि इतर कवींपेक्षा त्यांची काव्यरचना विपुलही आहे. रविकिरण मंडळातील 'रवि' माधव ज्यूलियन १९३९ साली गेले. दुसरे गिरीश १९७४ साली गेले तरी त्यांची कविता विशेष सामर्थ्याने प्रगट झालेली दिसत नाही. रविकिरण मंडळात इतरही सदस्य होते पण त्यांची काव्यनिर्मिती अगदीच त्रोटक स्वरुपाची पण यशवंत मात्र आपल्या मृत्यूपर्यंत कविता लिहीत होते. आणि रविकिरणमंडळाची धुरा एकटेच सांभाळीत होते.

रविकिरण मंडळातील कवी म्हणून यशवंतांचा विचार करताना रविकिरण मंडळाच्या कवितेचे जे विशेष होते ते यशवंतांच्या कवितेत किती दिसून येतात हे पाहाणे योग्य ठरते. त्याबरोबच रविकिरण मंडळातील इतर कवींचा त्यांच्यावर प्रभाव कितपत पडला हे पहावे लागते परसवर्णांचा वापर, नवनवीन वृत्ते निर्माण करणे अथवा मंडळाने निर्माण केलेली वृत्ते कवितेत वापरणे, अनुस्वराचा वापर डांबिले ऐवजी डाम्बिले, कमंडलू - कमण्डलू असा केला काव्यगायनाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला तो रविकिरण मंडळातील कवींनी. यशवंते हे त्यात अग्रेसर होते आणि रविकिरण मंडळातील इतर कोणत्याही कवीपेक्षा अधिक लोकप्रियता यशवंतांनाच मिळाली. प्रेमविषयक ज्या नव्या जाणिवा रविकिरणमंडळाने निर्माण केल्या, शारिरिकतेपासून प्रेमाला दूर नेण्याचा प्रयत्न केला तो यशवंतांच्या कवितेतही आहे. उलट त्यांची प्रेमकविता संयत व सात्विक आहे. शरीरापेक्षा मनाच्या सौंदर्याला महत्व देणारी आहे. प्रेमाच्या बाबतीत स्वप्नरंजनात गुंगण्यापेक्षा ते वास्तवातच रमले. प्रेमनिराशेनंतर पूर्वीचा प्रियकर भाई बनतो असा जो माधवरावांच्या प्रेमकवितेत येणारा आशय आहे तो यशवंतांच्या कवितेत नाही. आत्यंतिक भावविवशता आणि स्वप्नाळूपणा हे दोषही नाहीत की ती निव्वळ (गिरीशांप्रमाणे) प्रसंग परतेकडेही झुकली नाही. त्यांनी भावनिकतेवर अधिक भर दिला. प्रसंगाने काव्य निर्माण केले नाही आणि केले तर त्यातून सार्वकालीक आशय व्यक्त केला.

माधव ज्यूलियन आणि गिरीश यांच्याप्रमाणेच यशवंतांनाही साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद लाभले. इतर मानसन्मानही मिळाले. रविकिरण मंडळातील बहुतेक कवी हे पदवीधर होते आणि यशवंत नुसते मॅट्रीक झालेले पण म्हणून मंडळात कधी अपमानाची वागणूक मिळाली नाही. यशवंतांनीही भरपूर वाचनाने ही उणिव भरुन काढली.

रविकिरण मंडळाचा प्रभाव त्यांच्यावर पडला तो असा गोविंदग्रज नुकतेच गेले होते. पण त्यांच्या अवास्तव पण अद्‌भुतरम्य काव्याची भुलावणी मागे राहिली होती याच सुमारास माधव ज्यूलियन पुण्यास दाखल झाले होते आणि त्यांनी राधा-कृष्णांचा आडपडदा फेकून देऊन वास्तव आणि प्रत्यक्ष (DIRECT) प्रेमकाव्याचा नवा प्रवाह प्रेमकाव्याचा नवा प्रवाह मराठीत आणला

होता. गिरीश पुण्यासच होते आणि अद्‌भुतरम्यता व स्त्रियांची परवशता या दोघांची सांगड घालत होते. नाना रानड्यांनी विरोधास न जुमानता प्रेमविवाह केला होता. आणि खरेखुरे प्रेमजीवन ते जगत होते. नव्या पिढीस हे नवे होते. त्यांनी प्रेमाच्या कल्पनेवरच प्रेम करणारी माणसे पाहिली होती. पण हा अनुभव वेगळा होता. यशवंतांच्यावर हे सर्व संस्कार घडले ते रानड्यांच्या जवळ आले. नवे विचार, नव्या उमेदी आणि नवे शब्द शिकले. 'गिरीशांच्यासह अद्‌भुतरम्यतेत रमले आणि माधव ज्यूलियनांच्या खऱ्याखुऱ्या प्रेमाच्या जिवंत प्रेमकाव्याने प्रभावित झाले. (१९)

मूळच्या शिदेरित या तीन संस्कारांची भर पडली. श्री.बा. व मनोरमा रानडे यांनी त्यांच्या कवितेला वळण लावण्याचे काम केले. यशवंत आपल्या मागील पार्श्वभूमीच्या आसऱ्याने नवे संस्कार पचवू लागले आणि काव्यात प्रकट करु लागले. सुरुवातीची त्यांची कविता नव्या संस्कारांपासून अलिप्त होती. केशवसुत टिळक आदी कवींचा परिचय झाला नव्हता. संस्कार झाले होते ते जुन्या वळणाच्या पंडिती कवितेचे. त्यांनी त्यांना सुरुवातीस मार्गदर्शन केले ते यशवंतांचे काव्यक्षेत्रातील गुरु साधुदास हेही पंडिती कवीच होते. पण रविकिरण मंडळातील व्यक्तींशी संबंध आल्यावर व पुढे मंडळाच्या स्थापनेनंतर मात्र प्रेम, त्यातील निराशा, सामाजिक अन्याय, विशेषतः स्त्रीजातीवर पुरुषाने किंवा समाजाने चालविलेला जूलूम, रुढींचा जाचकपणा व सामाजिक सुधारणेच्या कल्पना त्यांच्या काव्यांत प्रामुख्याने येऊ लागल्या. आपल्या भोवतालच्या परिस्थितीबद्दल तक्रारीच्या वृत्तीने त्यांचे ह्रदयकाश भरुन गेले व पुष्कळशी रचना मनाच्या या मुशीतून निघाली. (२०) पण जुन्या परंपरेचे संस्कार कायम राहिले, नवे विचार, नव्या प्रतिमा, ते जुन्याच्या आधरेच घेतात. त्यांच्या काव्यात पौराणिक दाखले व उल्लेख अगदी सहजपणे येतात. आणि ते नव्या भावनांशी बेमालूमपणे जोडले जातात. यशवंतांना यमकावर जे प्रभुत्व लाभले आहे ते त्यांच्या या जुन्या वारशामधूनच आधुनिक मराठी कवितेत यशवंतांइतकी विविध यमकांची खैरात कुणी केली नसेल. (२१)

परभाषेचा प्रभाव त्यांच्यावर फारसा पडला नाही. इंग्रजी संस्कृतच्या प्रभावापासून ते दूर राहिले. माधव ज्यूलियनांचा फारसीचा प्रभाव त्यांच्यावर जाणवत नाही. समर्थांचे रोकठोक करडे बोल, पंडिती कविता आणि ग्रामीण भागात बालपण गेल्याने ग्रामीणत्वाचा ठसा त्यांच्या भाषेवर आहे. ग्रामीण जीवनातले अनुभव आणि शब्द ते सहजपणे वापरीत. त्यांच्या काव्यरचनेतही कितीतरी अनगड शब्द आलेले आहेत. त्यांच्या भाषेचं मराठपण स्वभावसुंदर आहे. कवी यशवंतांच्या मनावर आणि भाषेवर इंग्रजी किंवा संस्कृत कवितेचं आक्रमण झालेलं नाही. कवि यशवंतांचो कविता ही मराठी माणसाची कविता वाटते. अगदी 'मऱ्हाटी'. (२२) सर्वांना समजेल अशी सुबोध कविता त्यांनी लिहीली. पंडित्यप्रदर्शन अथवा रसिकांची अवगणना त्यात नाही. त्यांच्या कवितेत प्रासदिकता आहे. कल्पनेच्या उंचच उंच भराऱ्या मारणे त्यांना जमलेले नाही. त्यांची कविप्रतिभा वास्तवातच अधिक रमलेली दिसते.

यशवंत पूर्वसूरींच्या आणि समकालिनांच्या प्रभावापासून दूर राहिलेले आहेत. स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्व साकारत रसिकमनावर त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. 'केशवसुत आणि केशवसुत संप्रदाय किंवा त्यांचे प्रेरणास्थान ठरलेली इंग्रजी रोमँटीक कविता यांचा यशवंतांच्या कवितेशी तसा आंतरिक आत्मिक संबंध नाही. फार काय. रविकिरण मंडळातील कविमित्रांच्या कवितेशी

त्यांच्या कवितेचं निखालस एकरुपत्व किंवा एकजिवित्व घडल्याचं जाणवत नाही..... रविकिरण मंडळात असूनही कवी यशवंत वेगळे होते. (२३) पण त्यांच्या मूळ प्रतिमेला पैलू पाडण्याचे काम रविकिरणमंडळाने केले. रविकिरण मंडळातील व त्यापूर्वीच्या त्यांच्या कविता पाहिल्या की हे सहज ध्यानात येते. रविकिरणमंडळातील इतर कवींच्या तुलनेत त्यांचे शिक्षण कमी झालेले होते पण प्रतिभेचे अलौकिक देणे त्यांना असे काही लाभले होते की इतरांपेक्षा अधिक लोकप्रियता त्यांना मिळाली आणि मानसन्मानही.

रविकिरणमंडळातील इतर कवीपेक्षा त्यांची काव्यरचनाही अधिक आहे. एक तर त्यांना आयुष्यही इतर कवी सदस्यांपेक्षा जास्त लाभले. आणि आपल्या मृत्यूपर्यंत त्यांनी कविता लेखन केले. खरे तर तोपर्यंत काव्यात बरेच प्रवाह आले होते. नवकाव्यही जुने झाले होते. पण यशवंतांच्यावर त्याचा फारसा प्रभाव जाणवत नाही. थोडासा फरक जाणवतो तो मुक्त छंदाचा वापर केल्याने. स्फूट कवितालेखन त्यांनी उत्तरकालात सोडून दिले. दिर्घकवितेचे माध्यमच त्यांनी स्वीकारले. अभ्यासपूर्णता जास्त आणली. उदा. 'छत्रपती शिवराय' या ऐतिहासिक काव्याच्या रचनेसाठी त्यांनी बराच अभ्यास केला. तसेच या दीर्घ रचनेसाठी दीर्घ कालखंडाचीही आवश्यकता असते. 'रणदुर्गा झाशीवाली' हेही ऐतिहासिक काव्य, दीर्घ काव्यरचनाच. पण 'छत्रपती शिवराया' या महाकाव्याइतकी दीर्घ नाही. 'मुठे लोकमाते' हेही दिर्घ काव्य पण हे प्रसंगपर आहे. विषयाची निवड करुन, विषयाचे बंधन स्विकारुन कवितारचना केल्याने पूर्वीच्या कवितेचे विशेष या कवितेत उमटत नाहीत. भाषा तेवढी बदलली नाही हे जाणवले. पण आशय विषयाच्या बाबतीत निर्बंध आल्याने पहिल्या कवितेचे हे विशेष समजून घ्यायला मार्गच उरत नाही. मात्र रविकिरण मंडळात येण्यापूर्वी त्यांच्या कवितेचे जे स्वरुप होते. अथवा त्यांच्या मनाला ज्या काव्याविषयाची भुरळ पडत होती. तेच काव्यविषय त्यांनी उत्तरकालात प्रदीर्घ काव्यरचनेसाठी स्वीकारलेले दिसतात. 'मराठ्यांचे महाभारत' लिहीण्याचा त्यांचा मानस होता पण प्रकृतीच्या अस्वास्थाने हे शक्य झाले नाही. पण इतिहास गायनाचे मूळाचे वेड अंशत: तरी त्यांनी पूर्ण केलेच . समर्थ रामदास, छत्रपती शिवराया, ह्या विभूती प्रथमपासून त्यांच्या आदराचे विषय होते. 'समर्थ रामदास एक अभ्यास' हे गद्य पुस्तक लिहून समर्थ रामदासांच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला आहे. कारण लहानपणापासून मन सुसंस्कारीत करण्याचा प्रयत्न केला तो रामदासांच्या वाङ्मयाने. 'छत्रपती शिवराय' हे मराठ्यांच्या महाभारताचा पहिला खंड. पुढे लिहीने झाले नाही. 'रणदुर्गा झाशीवाली' हा त्याचा शेवटचा खंड लिहून कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळविला.

मात्र रविकिरण मंडळात असताना त्यांच्या काव्यकर्तृत्वाला जो बहर होता तो नंतर राहिला नाही. रविकिरणमंडळात असतानाच त्यांच्या हातून बरीच काव्यनिर्मीती झाली. एकतर एकूण रविकिरण मंडळच यावेळी प्रसिध्दीच्या शिखरावर होते. यामुळेही त्यांच्या काव्यलेखनास चालना मिळाली असावी. अथवा कवीमित्रांबरोबरच्या चढाओढीनेही हे होत असावे. पण रविकिरणमंडळाच्या उत्कर्षकालात त्यांच्या हातून बरीच आणि उच्च दर्जाची काव्यनिर्मिती झाली हे नि:संशय.

**इतरांपेक्षा खास वेगळेपण -**

रविकिरणमंडळातील कवी हे शिक्षणाच्या नोकरीच्या, आणि व्यवसायाच्या निमित्ताने पुण्यात एकत्र झालेले होते. ते वाढले होते. वेगवेगळ्या वातावरणात, वेगळ्या परंपरेत, सर्वांचे शिक्षणही सारखे नव्हते. पण शारदामंदिरातून बाहेर पडल्यानंतर हा वर्ग

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

समाधानध्येयी बनला. खरे तर समाधानध्येयी होता म्हणून तर शारदामंदिरातून बाहेर पडला. या मंडळात ऐकमेकांच्या कविता वाचून दाखवित, एकमेकांच्या कवितेत सुधारणाही सुचविल्या जात. हे कार्य संघटिरित्या झाल्याने सर्वांच्या कवितांत काही साम्य असणे अपरिहार्य होते. यशवंतांची कविताही रविकिरणमंडळात आल्यावर बरीच पालटली, समाजसुधारणा, प्रेम, स्त्रिविषयी सुधारलेला दृष्टीकोन, ही तत्कालीन सुशिक्षित वर्गाची दृष्टी त्यांनाही लाभली. माधव ज्यूलियन हे फारसीचे अभ्यासक फारसी कवितेच्या त्यांच्यावर खूप परिणाम होता. त्यांनी मराठीत फारसी शब्दांची प्रमाणाबाहेर मिसळ केली. फारसी कवितांचे मराठीत रूपांतर केले. गिरीशांनी समाजातील दु:खित पिडीतांविषयी सहानुभूतीने लिहीले आहे. यशवंतांची कविता रविकिरण मंडळाची कविताही होती. इतर कवींच्या कवितेशी काही बाबतीत साधर्म्य दाखवित होती तरी इतरांपेक्षा वेगळी होती. आपली जुनी परंपरा त्यांनी सोडली नाही. त्या जुन्या परंपरेचे पक्के ठसे त्यांच्या मनावर होते. म्हणूनच ते कवितातून जी प्रतिक वापरतात ती पुराणातील, रामायण, महाभारत आणि ग्रथांतील असतात. आणि ती बहुधा सर्वश्रुत असणाऱ्या पौराणिक ग्रथांतील असतात. कवितेची भाषाही पूर्णपणे संस्कारित झालेली दिसत नाही. कुठे संस्कृतप्रचुर शब्द, तर कुठे ग्रामीण भाषेतील अनगड शब्दही ते मधेच घुसडून देतात. याबाबतीत तर ते इतरांपेक्षा नक्की वेगळेपणाची साक्ष पटविते. भावगीतातून कथा साकार करण्याचा पहिला क्रांत्तीकारक प्रयोग त्यांनी केला. रविकिरणमंडळातील इतर कवींनी त्याचे अनुकरणही केलेले दिसत नाही. त्यांनी राज्यारोहणावरील 'काव्यकिरिट' हे काव्य लिहून राजाला लोकांच्या हिताविषयी जागरूक राहण्याचा संदेश दिला आहे. या काव्याने त्यांना 'राजकवी' हा किताब मिळवून दिला. माधव जूलीयन, गिरीश, किंवा रविकिरण मंडहातील अन्य कोणा कवीने अशी प्रसंगपर दिर्घकाव्यरचना केलेली नाही. 'छत्रपती शिवराय' सारखी रचनाही अन्य कोणाकडून झालेली नाही. हे मराठीतील पहिले महाकाव्य लिहून यशवंतांना महाकवीचा दर्जा मिळाला. तसे इतर कवींच्या बाबतीत घडले नाही. माधव जूलियनांना "प्रणय पंढरीचे वारकरी" गिरीशांना 'कविश' तर यशवंतांना 'दु:खाचे शाहिर' म्हटले गेले. त्यांच्या निराशावादी कवितांमुळे त्यांना ही पदवी मिळाली. इतर कवीहून अधिक अशा निराशेने ग्रासलेल्या मनोवस्थेचे चित्रण करणाऱ्या कविता त्यांनी लिहील्या. त्यांनी लिहीलेली कौटुंबिक कवने आणि जानपदगीते हा रविकिरणमंडळाचा प्रभाव नव्हती तोही त्यांच्या मुळ स्वभावाचा परिपाक होता. "त्यांच्या इतकी विविध, विपुल व सरस कौटुंगिक कवने दुसऱ्या कुणाही कवीने लिहीलेली नाहीत." (२४) जानपदगीतातूनही त्यांची ग्रामसंसकृतीशी असणारी अलोट श्रध्दाच दिसते.

तात्विक विवेचनापेक्षा आत्यंतिक भानविवशतेकडे त्यांनी कविता झुकलेली आहे. कमी शिक्षण किंवा त्यांच्या मनाचीच ती प्रकृती असल्याने असे झाले असावे. त्यांचे आणखी खास वेगळेपण असे की त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले नसून, सुरेल असाआवाज नसूनही त्यांचे काव्यगायन कमालीचे लोकप्रिय होते. वयाच्या सत्तरीपर्यंत त्यांनी काव्यगायनाचे कार्यक्रम केले. महाराष्ट्र शासनाने त्यांना 'महाराष्ट्र कवी' हा किताब देऊन त्यांच्या लोककवित्वाचाच सन्मान केला.

केवळ रविकिरण मंडळातील एक कवी म्हणून न राहता त्यांनी आपले एक वेगळे व्यक्तीमत्व साकारले. रविकिरणमंडळाशी शेवटपर्यंत निगडीत राहूनही त्यांनी हे साधले.

सारांश, यशवंत हे रविकिरण मंडळातले कवी शेवटपर्यंत ते आपली काव्यरचना रविकिरण मंडळाच्या नावावरच प्रसिध्द करत होते. रविकिरण मंडळाशी ते शेवटपर्यंत ते एकनिष्ठ होते. काव्याची स्थूल रुपाने समीक्षा करताना रविकिरण मंडळाचाच विचार केला जातो. एकेका कवीचा नाही. आणि या कवींचा विचार करणयाआधी रविकिरण मंडळाचाही उल्लेख येतोच. त्यांचा विचार रविकिरण मंडळातील कवी म्हणूनच अभ्यास केला जातो कारण काही समानशील, समानध्येयी वृत्तीच्या लोकांनी एकत्र येऊन हे रविकिरण मंडळ स्थापन केले. त्यांची सर्वांची मिळून एक निष्ठा तयार झाली यामुळे प्रत्येक कवीचे वगळेपणाने नव्हे तर एकसंघपणे रविकिरणमंडळाच्या कवितेचे काही विशेष निर्माण झाले त्यामुळे असे झाले. म्हणून या प्रकरणात रविकिरण मंडळ, त्यातील कवी, मंडळाच्या कवितेचे विशेष हे सर्व ध्यानात घेऊनही यशवंतांचे त्यातून प्रतित होणारे वेगळेपण जाणवत राहते हे मात्र नि:संशय !

## संदर्भ टिपा

१) 'कवी गिरीश एक साहित्यिक आकलन' : डॉ. प्रभावती येळगावकर. सन्मित्र प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९७.पृ.१७

२) तत्रैव . : पृ.१७

३) 'साहित्यिक गप्पा दहा साहित्यिकांशी' : जयवंत दळवी. सन पब्लिकेशन्स. प्रथमावृत्ती १९८५.

४) तत्रैव. : पृ. १५४.

५) तत्रैव : पृ. १५५.

६) 'आधुनिक कवी - भाग दुसरा' : दामोदर नरहर शिखरे, दी टिचर्स अयडियल पब्लिशिंग हाऊस लि. पुणे-२, प्रथमावृत्ती १९५३.

७) उनि : 'साहित्यिक गप्पा' पृ.१५५

८) 'त्रिज्या' : नागनाथ कोतापल्ले, प्रोग्रेसिव्ह को-ऑप. पब्लिकेशन्स सोसायटी लि. औरंगाबाद. प्रथमावृत्ती १९७८.पृ.९०.

९) 'अर्वाचीन मराठी काव्य' : रा. श्री. जोग, मुंबई मराठी साहित्य संघ, द्वितीय आवृत्ती - १९५१. पृ.२१९.

१०) 'पासंग' : कुसुमावती देशपांडे, मौज प्रकाशन मुंबई. चौथी आवृत्ती. १९८७ पृ.३४.

११) 'मराठी कविता : स्वरूप व विवेचन' - निशिकांत ठकार, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९७७ पृ.२९७.

१२) 'झेंडूची फुले' : प्र. के.अत्रे परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई, आठवी आवृत्ती - १९७२ प्रस्तावना - स.ग.मालशे. पृ.१८.

१३) 'महाराष्ट्र जीवन' : संपादक - गं.बा. सरदार, लेख - 'वाङ्मय - आधुनिक काल.' रा.शं. वाळींबे पृ. ३३५

१४) तत्रैव पृ. ३३७

१५) उनि : कवि गिरीश एक साहित्यिक आकलन. पृ. ३५

१६) तत्रैव. : पृ. ३७

१७) उनि. : अर्वाचीन मराठी काव्य पृ. १८८

१८) 'पर्वकाल ये नवा' : यशवंत प्रकाशक - सौ. नीरा पेंढरकर, पुणे-२ पहिली आवृत्ती २ मार्च १९५९ प्रस्तावना - वि.द. घाटे पृ. ३

१९) उनि. : अर्वाचीत मराठी काव्य पृ. २०६

२०) उनि. : 'पर्वकाल ये नवा' प्रस्तावना पृ. ३

२१) 'यशवंत गेले परि कवितारुपी उरले' : डॉ. व.दि. कुलकर्णी, रविवार सकाळ १ डिसेंबर १९८५

२२) तत्रैव.

२३) 'पाणपोई' : यशवंतकॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे - ३० सातवी आवृत्ती १९७९ प्रस्तावना - वि.स. खांडेकर. पृ. २८